# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर






**शहर सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाची माहिती मिळाल्यास तात्काळ खालील फोन नंबरवर कळवा.**

**पोलीस नियंत्रण कक्ष** 0240-2240500, टोल फ्री नं.-100

**व्हाट्स अप क्रमांक** 7741022222, 8390022222

## * अर्थिक फसवणुक न होण्यासाठी सुचना *

- मुदत ठेवीवर/गुंतवणुकीवर भारतीय रिझर्व बँकेच्या प्रचलीत व्याज दरापेक्षा जास्त व्याज दर देणाऱ्या संस्था / पतसंस्था / बँका यांचेशी व्यवहार करतांना त्यांची कायदेशीर वैधता पडताळल्या शिवाय गुंतवणुक करु नये.
- ए.टी.एम. मधून पैसे काढतांना ए.टी.एम. स्लॉट मध्ये लाईट ब्लींक होत नसल्यास पैसे काढु नये.
- ए.टी.एम. मधून पैसे काढतांना ए.टी.एम. स्लॉटवर स्किमर मशीन चिटकवलेले नाही ना याची खात्री करावी.
- ए.टी.एम. पिन कोड टाईप करतांना सदर कोड कोणत्याही कॅमेऱ्यातुन टिपला जाणार नाही याची खात्री करुन टाईप करावा.
- ए.टी.एम. कार्ड स्लॉटमध्ये टाकल्या नंतर व्यवहार पूर्ण न झाल्यास व तो रद्द करण्याबाबतचे बटन दाबले जात नसल्यास त्याच ठिकाणी १८० सेकंद थांबावे जेणे करुन व्यवहार रद्द होईल.
- कमी कालावधीत मोठा फायदा देणाऱ्या मल्टीलेवल मार्केटिंग कंपनीत गुंतवणुक कंपनीत गुंतवणुक करु नये.
- पैश्याच्या मोबदल्यात लकी ड्रॉ आधारे मोठ-मोठ्या भेट वस्तु वाटप केल्या जाणाऱ्या योजना मध्ये भाग घेऊ नये.
- हॉटेल/शॉपिंग मॉलचे बील अदा करतांना नोकराकडे, वेटरकडे डेबीट/क्रेडीट कार्ड देऊन त्यांचेवर विसंबुन राहु नये.
- नेट बँकींगचे व्यवहारात **Virtual / Visual Key Board** वापरुन पासवर्ड टाकावा.
- मोबाईल क्रमांक विनाकारण व अचानक बंद झाल्यास सर्व्हिस प्रोव्हायडर कडे तात्काळ खात्री करावी.
- सर्व्हिस प्रोव्हायडर कंपनीकडुन बोलत आहे असे सांगुन मोबाईल बंद करण्यास सांगितल्यास तो बंद करु नये, यामुळे कुटुंबातील व्यक्ती किडनॅप केले आहे असे सांगुन खंडणी मागितली जाऊ शकते.
- समोर दंगल चालु आहे,अंगावरील दागिने काढुन ठेवा, पोलीस तपासणी चालु आहे, असे सांगितल्यास त्यांचे सुचनांचे पालन करु नये.
- अंगावर विष्टा / घाण पडल्याचे सांगितले तर त्याकडु दुर्लक्ष करुन आपणा जवळील मौल्यवान वस्तु व रोख रकमेची काळजी घ्यावी.
- कोणत्याही कंपनीबाबत नोकर भरतीची जाहिरात असल्यास मुलाखती नंतर व नौकरी लागण्यापुर्वी पैसे दिल्यास फसवणुक होऊ शकते.
- लोन देणाऱ्या कोणत्याही बँकेकडुन लोन मंजुरी पुर्वी पैश्याची मागणी केल्या जात नाही व ते देऊ नयेत.
- परदेशात जॉब मिळवुन देण्याची बतावणी करुन व्हिजा/पासपोर्ट/अन्य कारणासाठी पैशाची मागणी केल्यास अशा संस्थेबाबत/व्यक्ती बाबतची चौकशी संबंधीत पोलीस ठाणे/आर्थिक गुन्हे शाखेकडे करावी.
- मोबाईल टॉवर बसवण्या बाबतच्या जाहिराती बहुदा फसव्या असतात.
- चेहरा ओळखा, डोळे ओळखा, अशा जाहिराती मध्ये मिळालेले बक्षीस प्राप्त करुन घेण्यासाठी रोख रकमेची मागणी करुन फसवणुक केली जाते.
- कोणतीही बँक ए.टी.एम. चा पिन क्रमांक व ए.टी.एम. क्रमांकाची मागणी करत नाही.
- ओळख पत्र व पत्त्या बाबतचे कागदपत्र देतांना ते कोणत्या कारणासाठी दिले आहेत. याबाबत आपले सहीचे खाली तसे नमुद करावे.
- फसवणुकी संदर्भात आपण पोलीस आयुक्तालयाच्या वरिल क्रमांकावर माहिती वॉट्सअप करु शकता किंवा सहाय्य मागु शकता :